# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 08/11/2019**

**सभा सुचना क्रं. 16**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **मागील मा. स्थायी समिती सभा दि. 05/09/2019 व दि. 11/09/2019 व दि.13/09/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.** | **ठराव** :- मागील स्थायी समिती सभा दि. 05/09/2019, दि. 11/09/2019 व दि. 13/09/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त हे माहितीस्तव दिलेले आहे. त्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर  सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील भाबोळा ते वसई या मुख्य रस्त्यालगत विजय सेल्स, आराध्य , व " डिमार्ट समोरील जागेत दुचाकी व चारचाकी वाहनतळ तयार करुन पार्कींग भाडे वसुली करणे कामी निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- उपरोक्त विषयाची सभागृहात चर्चा करण्यांत आली, त्यानुसार मे. आफताब शेख यांची निविदा जास्त दराची होती. परंतु त्यांनी पत्र देवून काम करणेस असमर्थतता दर्शविली आहे. त्यामुळे सदर कामासाठी दोनच निविदा वैध आहेत. तथापि महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे वाढीचे दृष्टीने पे ॲण्ड पार्कींगसाठी तासाचे दर यामध्ये वाढ करून त्याप्रमाणे शेजारील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दर यांची माहिती घेवून पे ॲण्ड पार्कींगसाठी भाडे वसुलीकरीता अभिकर्ता नेमणेसाठी फेरनिविदा मागविणेस तसेच मे.आफताब शेख यांची निविदा अनामत जप्त करून उर्वरीत निविदा धारकांची निविदा अनामत रक्कम परत करणेंस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. हार्दिक राऊत  सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका